# पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम

काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दूरध्वनी क्र. — ०७२५२-२३४८२४
ई-मेल :- sp.washim@mahapolice.gov.in
वेबसाईट :- www.washimpolice.gov.in


---

**• प्रेस नोट •** दि.३०.११.२०२२

## ‘अमरावती परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा — २०२२’ची उत्साहात सांगता ; मा.पोलीस उपमहानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र यांच्या हस्ते बक्षीस वितरण संपन्न.

***

दि.२५.११.२०२२ पासून सुरु झालेल्या ‘अमरावती परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा — २०२२’ चा समारोप सोहळा दि.२९.११.२०२२ रोजी विजेत्यांना बक्षीस वितरण, मार्च पास परेड, सांस्कृतिक कार्यक्रम सोबत स्नेहभोजन अशा स्वरूपात नवीन पोलीस मुख्यालय, वाशिम येथील कवायत मैदानावर पार पडला. सदर समारोपीय कार्यक्रमास मा.श्री.चंद्रकिशोर मीणा, पोलीस उप-महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती हे प्रमुख अतिथी म्हणून लाभले होते.

सदर पोलीस क्रीडा स्पर्धांचे यजमानपद जिल्हा स्थापनेपासून प्रथमच वाशिम जिल्हा पोलीस दलास मिळाले होते. मा.पोलीस उप-महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी सोपविलेली हि जबाबदारी मा.पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह यांनी लीलया पेलली. स्पर्धाकरिता मैदान तयार करणे, मैदावरील आखणी व सजावट, मैदान दिशादर्शक नकाशा, प्रत्येक मैदानावर त्या-त्या खेळाबद्दल माहिती देणारे QR Code लावलेले स्टॅंडी बॅनर, सेल्फी स्टॅंड, आयोजक व पंचांना पुरविण्यात आलेले ओळखपत्रे, खेळाडू पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या निवासाची व भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था आदी बाबी ह्या क्रीडा स्पर्धेच्या आकर्षण ठरल्या होत्या. प्रत्येक खेळप्रकाराकरिता समिती नेमून त्यावर अनुभवी अधिकारी व अंमलदारांची नेमणूक करण्यात आली होती.

या क्रीडा स्पर्धांमध्ये सांघिक खेळांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक तर वैयक्तिक / ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारांमध्ये सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक देण्यात आले होते. त्यानुसार प्रत्येक सहभागी संघास गुण देण्यात आले होते. अंतिम गुणपत्रकानुसार अमरावती शहर पुरुष संघ १८४ गुण व अमरावती शहर महिला संघ १३० गुण मिळवत प्रथम क्रमांकावर राहिला. अमरावती शहरच्या संघाने १४ सुवर्ण पदक, ०५ रजत पदक तर ०१ कांस्य पदकाची कमाई करत जनरल चॅम्पियनशिप पटकावले. बेस्ट ॲथलिट पुरुष म्हणून अशोक राठोड (यवतमाळ संघ) तर बेस्ट ॲथलिट महिला म्हणून वनिता पवार (यवतमाळ संघ) यांना गौरविण्यात आले. ०५ दिवस चाललेल्या या क्रीडा सोहळ्याचा समारोप विजेत्या संघांना मा.श्री.चंद्रकिशोर मीणा, पोलीस उप-महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांच्याहस्ते बक्षीस वितरणाने संपन्न झाला. मा.पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली अल्प कालावधीत मैदानांची तयारी करून ०५ दिवशीय क्रीडा स्पर्धा अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल मा.पोलीस उप-महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी पोलीस अधीक्षक वाशीम व संपूर्ण पोलीस दलाचे कौतुक केले.

‘अमरावती परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा — २०२२’ च्या समारोप कार्यक्रमासाठी मा.श्री.चंद्रकिशोर मीणा, पोलीस उप-महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.पोलीस अधीक्षक, वाशिम श्री.बच्चन सिंह, मा.पोलीस अधीक्षक, अकोला श्री.संदीप घुगे, मा.पोलीस अधीक्षक, यवतमाळ श्री.पवन बनसोड, मा.पोलीस अधीक्षक, बुलढाणा श्री.सारंग आव्हाड, मा.पोलीस उपायुक्त, अमरावती शहर श्री.विक्रम साळी व इतर मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. सदर स्पर्धा यशस्वीपने पार पडण्यासाठी मा.पोलीस अधीक्षक, वाशिम श्री.बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, सर्व समिती प्रमुख पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, वाशिम, सर्व कवायत निर्देशक व पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी मेहनत घेतली.

**(जनसंपर्क अधिकारी)**
पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.